RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १०, अंक ७] शुक्रवार, जानेवारी १२, २०२४/पौष २२, शके १९४५ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ७**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## ग्रामविकास विभाग

३ रा मजला, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ, फोर्ट, मंत्रालय,
मुंबई ४०० ००१, दिनांक १२ जानेवारी २०२४.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक मविसे-१०१६/प्र.क्र. १९/आस्था-३.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र विकास सेवा (रचना, वर्गीकरण आणि भरती) नियम, १९७३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे खालीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

**१.** या नियमांना महाराष्ट्र विकास सेवा (रचना, वर्गीकरण आणि भरती) (सुधारणा) नियम, २०२४ असे संबोधण्यात येईल.

**२.** महाराष्ट्र विकास सेवा (रचना, वर्गीकरण आणि भरती) नियम, १९७३ (यात यापुढे "मूळ नियम" असे संबोधले जाईल.) या नियमामधील नियम ६ मधील

(अ) उपनियम (१) मध्ये कलम (ब) मधील मजकुराऐवजी खालीलप्रमाणे मजकुर दाखल करण्यात येईल :—

"(ब) खालील तक्त्यात नमूद केलेले पद धारण करणाऱ्या व त्या पदावर किमान ७ वर्षे इतक्या नियमित सेवेचा अनुभव असणाऱ्या उमेदवारांमधून सेवा ज्येष्ठतेच्या आधारे खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे आरक्षणाच्या टक्केवारीनुसार पदोन्नतीद्वारे :—

| अ.क्र. (१) | संवर्ग (२) | आरक्षणाची टक्केवारी (३) |
|---|---|---|
| १ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट क) (कृषी) | १५ |
| २ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट क) (पशुसंवर्धन) | ५ |

| अ.क्र. (१) | संवर्ग (२) | आरक्षणाची टक्केवारी (३) |
|---|---|---|
| ३ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट क) (शिक्षण-शिक्षकेतर) | ५ |
| ४ | जिल्हा सेवा (गट क) (लिपिक) | १५ |
| ५ | जिल्हा सेवा (गट क) (सांख्यिकी) | १० |
| ६ | जिल्हा सेवा (गट क) (कार्यकारी व ग्राम विस्तार) | ४० |
| ७ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट क) (समाजकल्याण) | ५ |
| ८ | जिल्हा तांत्रिक सेवा (गट क) (आरोग्य) | ५.”; |

(ब) उपनियम (२), (३), (४) व (५) वगळण्यात येतील.

(क) उपनियम (६) च्या कलम (६) मधील मजकुराऐवजी खालील मजकूर समाविष्ट करण्यात येईल.

“(६) सहायक गट विकास अधिकारी (गट-ब) (राजपत्रित) या पदावरील पदोन्नती व नामनिर्देशनाने नियुक्तीचे प्रमाण अनुक्रमे ५०: ५० टक्के असे राहील.”

**३.** मुख्य नियमातील नियम क्रमांक ९ मधील मजकुराऐवजी खालील मजकूर दाखल करण्यात येईल :—

“**९.** (१) नियम ६ (ख) मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, सदर पदावर पदोन्नती मिळण्यापूर्वी मराठी भाषा व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण केलेली नसल्यास अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली नसल्यास शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार किंवा त्याबाबत शासनाने वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांनुसार, सदर पदावरील पदोन्नतीपूर्वी मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(२) नियम ६ (क) मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने शासनाने वेळोवळी केलेल्या नियमांनुसार किंवा वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांनुसार, मराठी व हिंदी भाषा परीक्षा नियुक्तीपूर्वी उत्तीर्ण केलेली नसेल तर, नियुक्तीनंतर विहित मुदतीत हिंदी भाषा व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील अथवा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील. सदर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत अशा व्यक्तीला वार्षिक वेतनवाढ व वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.”.

**४.** मुख्य नियमातील नियम क्रमांक १० मधील मजकुराऐवजी खालील मजकूर दाखल करण्यात येईल :—

“**१०.** (१) नियम ६ (ख) मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीकडे शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार किंवा वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांनुसार, सदर पदावरील पदोन्नतीपूर्वी संगणक कार्यचलनाचे (कॉम्प्युटर ऑपरेशन्स) प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट मिळवलेली नसल्यास संगणक कार्यचलनाचे (Computer Operations) प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

(२) नियम ६ (क) मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीकडे शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार किंवा वेळोवेळी पारित केलेल्या आदेशांनुसार, संगणक कार्यचलनाचे (कॉम्प्युटर ऑपरेशन्स) प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट मिळवलेली नसल्यास संगणक कार्यचलनाचे (Computer Operations) प्रमाणपत्र विहित मुदतीत धारण करणे आवश्यक राहील, अन्यथा अशा व्यक्तीला सदर प्रमाणपत्र प्राप्त करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ व वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.”.

**५.** मूळ नियमामधील नियम क्रमांक १२ मधील मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

“**१२.** (१) सहायक गट विकास अधिकारी (गट-ब) (राजपत्रित) या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षे परिविक्षाधीन असेल. सदर परिविक्षा कालावधी जास्तीतजास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. शासनाच्या धोरणानुसार सदर व्यक्तीस वाढविलेला कालावधी धरून परिविक्षेचा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे अनिवार्य राहील. शासनाच्या परिविक्षा धोरणानुसार, संबंधित व्यक्तीने परिविक्षा कालावधी (वाढविलेल्या कालावधीसह) समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास सदर व्यक्तीच्या सेवा समाप्त करण्यास पात्र राहतील.

(२) सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत (सीपीटीपी) सेवाजेष्ठता, विभागीय परिक्षा व अन्य अनुरूप (consentaneous) बाबींकरिता विहित केलेले नियम व नियमन हे नियम ६ (अ) मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या व एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या अधिकाऱ्यांना लागू राहतील.".

**६.** मूळ नियमामधील नियम १२ नंतर खालील नियमाचा समावेश करण्यात येईल :—

"**१३.** (१) नियम ६ (अ) मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीसाठी शिफारस केलेल्या व्यक्तींनी महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाची घोषणा) नियम, २००५ किंवा शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले अन्य नियम, आदेशानुसार घोषणापत्र सादर करणे आवश्यक राहील.

(२) ज्या व्यक्तींना लहान कुटुंबाचे घोषणापत्र सादर करण्याच्या दिवशी दोन पेक्षा जास्त अपत्ये असतील अशी व्यक्ती शासकीय सेवेमध्ये नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेमध्ये नेमणूक झाल्यानंतर असे सिद्ध झाले की, त्या व्यक्तीला नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोन पेक्षा जास्त अपत्ये असतील तर ती व्यक्ती शासकीय सेवेमध्ये त्या पदावर राहण्यास अपात्र असेल.

**१४.** शासनाच्या सेवेत नियुक्त झालेल्या व्यक्तींना त्यांची नेमणूक केल्यानंतर शासनाने नियुक्तीबाबत ठरवून दिलेल्या अटी व शर्ती याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश व निर्णय लागू राहतील.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पं. खं. जाधव,**
शासनाचे उप सचिव.

## RURAL DEVELOPMENT DEPARTMENT

3rd Floor, Bandhkam Bhavan, 25, Marzban Path, Fort, Mantralaya,
Mumbai 400 001, dated the 12th January 2024.

*NOTIFICATION*

Constitution of India.

No. MDS-1016/CR 19/EST-3.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Development Service (Constitution, Classification and Recruitment) Rules, 1973, namely :—

**1.** These rules may be called the Maharashtra Development Service (Constitution, Classification and Recruitment) (Amendment) Rules, 2024.

**2.** In rule 6 of the Maharashtra Development Service (Constitution, Classification and Recruitment) Rules, 1973 (hereinafter referred to as "the Principal Rules"),—

(*a*) in sub-rule (1), for clause (*b*), the following clause shall be substituted, namely :—

"(*b*) by promotion of the persons holding the posts mentioned in the table appended hereto and having experience of at least seven years of regular service in that post on the basis of seniority in accordance with the percentage of reservation mentioned in the following table :—

| Sr. No. (1) | Service (2) | Percentage of Reservation (3) |
|---|---|---|
| 1 | District Technical Services (Class-III) (Agriculture) | 15 |
| 2 | District Technical Services (Class-III) (Animal Husbandry) | 5 |
| 3 | District Technical Services (Class-III) (Education-Non teaching) | 5 |
| 4 | District Services (Class-III) (Ministerial) | 15 |
| 5 | District Services (Class-III) (Statistical) | 10 |
| 6 | District Services (Class-III) (Executive and Village Extension) | 40 |
| 7 | District Technical Services (Class-III) (Social Welfare) | 5 |
| 8 | District Technical Services (Class-III) (Health) | 5."; |

(*b*) sub-rules (2), (3), (4) and (5) shall be deleted;

(*c*) in sub-rule (6), for clause (*6*), the following clause shall be substituted, namely :—

"(*6*) Appointment to the post of Assistant Block Development Officer, Group-B (Gazetted), shall be made by promotion and nomination, in the ratio of 50:50, respectively.".

**3.** For rule 9 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

**"9.** (*1*) A person to be appointed to the post mentioned in rule 6 (b) by promotion shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or has been exempted from passing those examinations before getting promoted to the said post.

(*2*) A person appointed to the post mentioned in rule 6 (a) by nomination shall pass the Marathi and Hindi languages examinations as per the rules made or order issued in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passes those examinations.".

**4.** For rule 10 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

**"10.** (*1*) A person to be appointed to the post mentioned in rule 6 (b) by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules made or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he has been exempted therefrom before getting promoted to the said post.

(*2*) A person appointed to the post mentioned in rule 6 (a) by nomination shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate of Computer Operations, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possess the same.".

**5.** For rule 12 of the Principal Rules, the following rule shall be substituted, namely :—

**"12.** (*1*) A person appointed to the post of Assistant Block Development Officer, Group-B (Gazetted), by nomination, shall be on probation for a period of two years. The probation period may be extended maximum up to one year. Completion of the probation period (including extended period) satisfactorily as per the probation policy of the Government, is mandatory. In the event of failing to complete the probation period (including extended period) satisfactorily as per the probation policy of the Government, his services shall be liable to be terminated.

(*2*) The rules and regulations of Combined Probationary Training Programme (CPTP), prescribed by the General Administration Department, from time to time, for the seniority, Departmental examination and other consentaneous matters, shall be applicable to the officers appointed by nomination on post mentioned in rule 6 (a) and taking training under the combined training programme.".

**6.** After rule 12 of the Principal Rules, the following rules shall be added, namely :—

**"13.** (*1*) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rule 6 (a) shall submit a Declaration of Small Family as per the provisions of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(*2*) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in the Government Service.

(*3*) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government service.

**14.** The terms and conditions specified by the Government, subsequent to the appointment of any Government Servant in any rules, orders or resolutions issued in this behalf by the Government, from time to time, shall also be applicable to the Government servant.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. K. JADHAV,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.